IDEAL - VOL. - V ISSUE - II ISSN 2319 - 359X (I.F.-4.08) ५१ MARCH-AUG.-2017

14

# महात्मा फुले आणि विविध धर्म परंपरा

**प्रा. दुनघव ए. डी.**

शंकरराव पाटील महाविद्यालय, भुम.

## प्रास्ताविक

महात्मा जोतीराव फुले समाजचिंतकाप्रमाणेच धर्मचिंतकही होते. हिंदू, मुस्लिम व ख्रिश्चन धर्मासह बौद्ध धर्माचाही त्यांचा फार मोठा व्यासंग होता. या सर्वच धर्माच्या सूक्ष्म परिशीलनातून फुल्यांनी जो धर्मविचार मांडला त्यावर बौद्ध तत्त्वज्ञानाचा स्पष्ट प्रभाव आहे. परंतु येथे हेही नोंदवणे गरजेचे आहे की, हा प्रभाव प्रत्येकच ठिकाणी आहे, असा दुराग्रह नाही. भगवान बुद्ध आणि महात्मा फुले यांच्या विचारांमध्ये व्यापक प्रमाणात साधर्म्यस्थळे आहेत. ही साधर्म्यस्थळे अनेकांना सहजसाधर्म्य वाटण्याची शक्यता आहे. अशा सहजसाधर्म्यावरून निश्चित प्रभाव असल्याचे निष्कर्ष काढणे चुकीचे ठरत असते. म्हणून महात्मा फुले यांच्या वैचारिक पृष्ठभूमीच्या जडणघडणीमध्ये कारक ठरणाऱ्या बौद्ध तत्त्वज्ञानाच्या प्रभावस्रोतांचा शोध घेणे महत्त्वाचे ठरते.

## फुलेपूर्व महाराष्ट्रातील बुद्ध धम्म

बुद्ध धम्माचा इतिहास केवळ भारतीय परिप्रेक्ष्यापुरता बंदिस्त नसून तो जागतिक आहे. मौर्यकुलोत्पन्न सम्राट अशोकाने धम्म विचार भारतासह जगभर पसरविला. त्यांच्याइतका महान धम्मप्रचारक जगात निर्माण झाला नाही. श्रीलंका, म्यानमार, कंबोडिया, व्हिएतनाम, थायलंड, इंडोनेशिया, बोर्निओ, मध्य आशिया, तिबेट, चीन, मंगोलिया, कोरिया, जपान, युरोप - अमेरिका, अफगाणिस्तान असे जगभरातील अनेक देश ख्रिस्तपूर्व काळात बौद्धधर्मीय होते. यापैकी आजही अनेक देश बौद्धधर्मीय आहेत. ''अफगाणातील शंभर टक्के लोक बुद्ध धर्माचे होते. तेथे बुद्ध धर्म होता. येथे बुद्ध धर्मात सात हजार भिक्षू होते.'' अशी महत्त्वपूर्ण नोंद डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केली आहे.

भारत देशात सम्राट अशोकाने बौद्ध धम्माला मोठ्या प्रमाणात राजाश्रय प्रदान केला. ८४ हजार बौद्ध स्तुपांची निर्मिती, बौद्ध विद्यापीठे, हजारो लेण्या, ठिकठिकाणी कोरलेले शिलालेख, भिक्षू संघ व खास बौद्ध धम्म प्रचारार्थ निर्माण केलेले धर्मखाते हे सम्राट अशोकाचे कार्य अद्वितीयच होते. त्यामुळे भारतीय समाज व संस्कृतीच्या पृष्ठभूमीत बौद्ध तत्त्वज्ञान चिरंतन राहिले. तत्कालीन सिलोनच्या राजाने अशोकपुत्र महेंद्राला जंबुद्वीपात किती भिक्षू आहेत, असे विचारले असता संपूर्ण जंबुद्वीपच काषायवस्त्रांनी प्रकाशमान झाले आहे, हे महेंद्राने दिलेले उत्तर तत्कालीन बौद्धमय भारताची साक्षच. आपल्या देशात साडेबाराशे वर्षे बौद्ध धम्म उत्कर्षाच्या शिखरावर होता. त्यामुळे हिंसेवर आधारलेल्या वैदिक धर्माला उतरती कळा प्राप्त झाली.

## म. फुल्यांची बौद्ध धार्मिक पार्श्वभूमी

महात्मा जोतिबा फुले यांच्या कर्तृत्वाचा कालखंड म्हणजे इंग्रजी राजवट आणि ख्रिश्चन मिशनऱ्यांचा कालखंड. या काळात सुधारणावादी मंडळी ख्रिश्चन धर्मातील मानवतावादी विचारांकडे सकारात्मक भूमिकेतून पाहत होती. हिंदू धर्मातील विषमतावादी विचारांपेक्षा ख्रिस्ती धर्मातील मानवतावाद या मंडळींना जवळचा वाटणेही स्वाभाविक होते. यामुळे महात्मा फुल्यांवर ख्रिस्ती पाश्चात्त्य धर्माचा प्रभाव असल्याची मांडणी अनेक अभ्यासकांनी केली. परंतु डॉ. सदानंद मोरे म्हणतात ते खरेच आहे की, ''ख्रिश्चन धर्मप्रसारक आणि इंग्रजी राज्यकर्ते यांच्याशी असलेल्या संबंधामुळे फुले यांना बदनाम व्हावे लागले. ख्रिस्ताळलेले असल्यापासून ख्रिस्त झाल्याचेही आरोप झेलावे लागले.'' याचा अर्थच असा की, चार्वाक, सांख्य, बौद्ध या भारतीय ईहनिष्ठ विचारपरंपरेशी त्यांचे घट्ट नाते होते.

महात्मा फुले यांच्या काळात बुद्ध धम्म लयास गेलेला होता आणि महाराष्ट्रात बुद्ध विचार होताच कुठे, असाही अनेकांना प्रश्न पडतो. परंतु चिरंतन मूल्ये कोणत्याही काळात नष्ट होत नसतात. ती वेगवेगळ्या कालखंडात वेगवेगळ्या रूपात जिवंत राहत असतात. महात्मा फुल्यांच्या काळात ही मूल्ये हिंदू समाज व संस्कृतीतील विविध धर्मसंप्रदाय, प्रथा, परंपरा इत्यादी घटकांच्या रूपात जिवंत होती.त्यांनी सर्वच घटकांचा सूक्ष्म अभ्यास केला होता. पुणे हे महात्मा फुल्यांच्या जन्मभूमी आणि कर्मभूमीचे शहर. या शहर व परिसराला बौद्ध धम्माच्या सांस्कृतिक इतिहासाची खूप मोठी परंपरा आहे. हे या परिसरातील कार्ले, भाजे, सासवड, जुन्नर, पुरंदर, शेलारवाडी या ठिकाणी उत्खननात सापडलेल्या बौद्ध लेण्यांवरून स्पष्ट होते. पुण्यामध्येही फर्ग्युसन टेकडीवरील गोखले स्मारकाच्या बाजूला अद्यापही एक बौद्ध लेणी असल्याचे इतिहासकार अनुमान करतात. म्हणजेच पुणे आणि त्याच्या सभोवतीचा प्रदेश प्राचीन काळात बौद्ध धम्माचे एक प्रमुख केंद्र होता. येथील सामाजिक, सांस्कृतिक पर्यावरणात बौद्ध धम्माची मूलतत्त्वे घट्ट रुतून बसली होती. ही मूलतत्त्वे महात्मा फुल्यांच्या दृष्टिआड होणे शक्य नव्हते. म्हणून ज्या काळात भारतीय धर्मविचार चिकित्सेच्या परिप्रेक्ष्यात बौद्ध धर्माला स्थान दिले गेले नाही त्याही काळात म. फुल्यांनी बौद्ध विचारांचा आवर्जून अभ्यास केला. एवढेच नव्हे तर ''तथागतांच्या विचारांकडे लोकांचे लक्ष वेधण्याचे कार्यही आधुनिक काळात त्यांनीच केले.'' हे डॉ. आ. ह. साळुंखे यांचे मत रास्तच आहे.

### अवैदिक विचार परंपरा आणि म. फुले

समाजक्रांतीला चिरंतन मानवी मूल्ये बळ प्रदान करत असतात. ज्या ज्या महापुरुषांच्या विचारात आणि कर्तृत्वात अशी मूल्ये असतात ते महापुरुष समाजाला प्रेरक आणि वंदनीय ठरत असतात. महात्मा फुले यांनी ऐतद्देशीय बहुजननिष्ठ पूर्वसुरींचा शोध घेऊन त्यांच्या विचारातून आणि कर्तृत्वातून अधोरेखित झालेली मानवी मूल्ये आपल्या लेखनातून मांडलेली आहेत.

प्रत्येक समाज आपले कर्तृत्व इतिहासाप्रमाणेच समाजमानसावर बिंबविलेल्या पुराणकथांमध्ये शोधत असतो. ऐतिहासिक दृष्टीने आंशिक सत्यासत्य असलेल्या पुराणकथांवर समाजाच्या तीव्र श्रद्धा असतात. त्या श्रद्धांचा प्रस्थापित वर्ग आपल्या सोयीनुसार गैरवापर करून घेत असतो. म्हणून पुराणकथांचे ऐतिहासिक सत्यशोधन होणे गरजेचे असते. हे काम म. फुल्यांनी निष्ठापूर्वक केले. त्यांच्या लेखनात अनेक पुराणकथा आलेल्या आहेत. त्यापैकीच एक बळीराजाची पुराणकथा. बळीराजावर दैवतीकरणाचा फासलेला शेंदूर खरडवून म. फुल्यांनी बळीचे एक लोककल्याणकारी राजा म्हणून व्यक्तित्व उभे केले. 'समतेचा पुरस्कर्ता', 'दीनाचा कैवारी', 'महापवित्र', 'सत्यवक्ता' अशी अनेक विशेषणे लावून ते बळीराजाचा गौरव करतात. ही त्यांनी केलेली इतिहासाची पुनर्मांडणीच होय.

### महात्मा फुल्यांची बौद्ध इतिहासविषयक मीमांसा

कोणत्याही समाजाचा गौरवशाली इतिहास त्या समाजाला प्रेरक ठरत असतो. वैदिक परंपरेतील इतिहासकारांनी भारतीय श्रमण, बहुजन समाजाच्या इतिहासाला विकृत रूप दिले. महात्मा फुले यांनी पुराणात दडलेल्या बहुजनांच्या इतिहासाचे सत्यशोधन करून बहुजननिष्ठ इतिहासाची पुनर्मांडणी केली. त्यांच्या इतिहास लेखनात मत्स्य, कच्छ यापासून ते परशुरामांपर्यंत बाहेरून आलेल्या आर्यांची एक परंपरा आणि शंखासुरापासून ते बाणासुरापर्यंतची दुसरी एतद्देशीयांची अवैदिक परंपरा स्पष्टपणे अधोरेखित झालेली आहे. या दोन परंपरांमध्ये युगानुयुगे चाललेला संघर्ष महात्मा फुले यांनी शोधक बुद्धीने मांडला. त्याचप्रमाणे बुद्ध धम्माच्या उदय-अस्ताचा इतिहासही त्रोटकपणे त्यांच्या लेखनात अधोरेखित झालेला आहे.

बुद्धपूर्व काळातही समाजव्यवस्था, धर्मव्यवस्था यावर ब्राह्मणी वर्चस्व कायम होते. धर्माच्या आडून बहुजन समाजात कर्मकांड, देवदैववाद, अंधश्रद्धा, जातीयता त्याही काळात खोलवर रुजलेली होती. ब्राह्मणी धर्माने सर्वांगीण जखडबंद केलेल्या भारतीय शोषित समाजाला दु:खमुक्त करण्यासाठी बुद्ध धम्माची स्थापना झाली असे महात्मा फुले म्हणतात. यासंदर्भात त्यांनी अशी मांडणी केली आहे की, ''पुढे काही काळाने चार नि:पक्षपाती पवित्र विद्वानास ब्रह्मकपटाविषयी बरे न वाटून त्यांनी बौद्ध धर्माची स्थापना करून, आर्य ब्राह्मणांच्या कृत्रिमी धर्माचा बोजवारा करून या गांजलेल्या अज्ञानी शुद्र शेतकऱ्यांस आर्यभटांचे पाशातून मुक्त करण्याचा झपाटा चालविला होता.'' बौद्ध धम्माच्या

समतावादी तत्वज्ञानापुढे विषमतेवर आधारलेल्या ब्राह्मणी धर्माचा पाया ढासळत चालला होता. या ऐतिहासिक सत्याची नोंद महात्मा फुले यांनी केली आहे.

## महात्मा फुले यांचा बुद्ध धम्मविषयक दृष्टिकोन

महात्मा फुले यांच्या लेखनात भगवान बुद्ध आणि त्यांच्या धम्माविषयी कमी वेळा संदर्भ आले असले तरी ते संदर्भ आदरपूर्वक आलेले आहेत. 'शाक्यमुनीसारखा विचारी सत्पुरुष', 'बुद्ध महाजन', 'बौद्धधर्मी सज्जन', 'बौद्ध धर्माचा चांगुलपणा' यासारख्या संबोधनावरून त्यांच्या विचारविश्वात बौद्ध धम्माला उच्च स्थान होते, हे स्पष्ट आहे.

महात्मा फुले यांनी बुद्धप्रणीत धर्मनिरपेक्षतेच्या तत्त्वाचा प्रत्यक्ष जीवनात अंगीकार केला. हे तत्त्व आपल्या लेखनात अंतर्भूत करताना त्यांचा बुद्ध धम्मविषयक आदरयुक्त दृष्टिकोनही स्पष्ट होतो. त्यांच्या मताप्रमाणे, ''...यास्तव कोणत्याही कुटुंबातील एका मानव स्त्रीने बौद्धधर्मी पुस्तक वाचून तिच्या मर्जीप्रमाणे पाहिजे असल्यास तिने तो धर्म स्वीकारावा व त्याच कुटुंबातील तिच्या पतीने जुना व नवा करार वाचून त्याच्या मर्जीप्रमाणे पाहिजे असल्यास त्याने ख्रिस्ती व्हावे व त्याच कुटुंबातील त्याच्या कन्येने कुराण वाचून तिच्या मर्जीप्रमाणे पाहिजे असल्यास तिने महमदी धर्मी व्हावे आणि त्याच कुटुंबातील त्याच्या पुत्राने सार्वजनिक सत्यधर्म पुस्तक वाचून त्याच्या मर्जीप्रमाणे पाहिजे असल्याने त्याने सार्वजनिक सत्यधर्मी व्हावे.'' सदरील तपशिलामध्ये महात्मा फुले बौद्ध धम्माला अप्रत्यक्षपणे आईचे स्थान देतात. ते स्त्रीला पुरुषापेक्षा काकणभर श्रेष्ठ मानतात. यावरून हेच स्पष्ट होते की, महात्मा फुले यांच्या वैचारिक परिप्रेक्षात बौद्ध धम्माला सर्वोच्च स्थान होते. महात्मा फुले यांना मुस्लिम व ख्रिश्चन धर्मात मानवी कल्याणाचे, समतेचे व शोषणरहित समाजव्यवस्थेला पूरक अशी काही तत्त्वे दिसत होती. याउलट भारतीय समाजव्यवस्थेला ब्राह्मणी, वैदिक हिंदू धर्माच्या नावाने जी विषमतामूलक व अमानवीय जातीयवादी, मानवाला जन्मत:च अस्पृश्य, शूद्र मानणारी व्यवस्था व हिंदू धर्म त्यांना आपलासा वाटत नव्हता. हे उपरोक्त तपशिलाचे दुसरे गर्भित आशयसूत्र आहे.

## इतर धर्माविषयी महात्मा फुले यांची भूमिका

मानवाचे शोषण, विद्रूपीकरण व अज्ञानात ठेवणाऱ्या ब्राह्मणी धर्म आणि समाजव्यवस्थेत सर्ववंचित समाजघटकांचे अनेक शतके शोषण झाले. महात्मा फुले यांना अशा मूल्यहीन धर्मव्यवस्थेपेक्षा मुस्लिम आणि ख्रिश्चन धर्मात काही मानवतावादी मूल्य असल्याचे दिसून आले. ब्राह्मणी धर्मातील तत्कालीन जाचक सामाजिक, धार्मिक परिस्थिती पाहता मुस्लिम व ख्रिश्चन धर्म एका विशिष्ट मर्यादेपर्यंत त्यांना जवळचे वाटणे साहजिक होते. त्यामुळे मुस्लिम व ख्रिश्चन धर्म आणि या धर्माचे प्रणेते याविषयी महात्मा फुले यांनी गौरवोद्‌गार काढले आहेत. मात्र या दोन्ही धर्मातील मनुष्य विघातकतेवर त्यांनी आवर्जून हल्लाही केलेला आहे. कोणत्याही मूल्यव्यवस्थेचा स्वीकार करताना महात्मा फुले यांचा निकष होता की, भारतीय शोषित समाजघटकांच्या उत्थानाचे कार्य जी मूल्यव्यवस्था ज्या प्रमाणात करते त्या प्रमाणातच तिचा स्वीकार व हेच कार्य ज्या प्रमाणात केले जाणार नाही त्या प्रमाणातच तिचा नकार. या भूमिकेतूनच महात्मा फुले आणि मुस्लिम धर्म, ख्रिश्चन धर्म यातील अनुबंधाचे परिशीलन करणे गरजेचे आहे.

## मुस्लिम धर्म आणि महात्मा फुले

महात्मा फुले ब्राह्मणी धर्मातील मनुष्यद्रोही अनेक घटकांवर हल्ला करत असतानाच दुसरीकडे मुस्लिम धर्माचा गौरव करतात. याचे कारण तत्कालीन विषम धर्माधिष्ठित समाजव्यवस्थेत शोधावे लागते. महात्मा फुलेंपूर्व काळ आणि समकालात सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आदी घटकांची नियंत्रक शक्ती म्हणून धर्म कार्यरत होता. ब्राह्मणी धर्माने देवदैववाद, जातीयता, कर्मकांड, अंधश्रद्धा यांना उत्तेजन देऊन दलित, शेतकरी आणि स्त्री जीवनाचे अनेक अंगाने शोषण केले. शूद्र असल्यामुळे एका ब्राह्मण मित्राच्या वरातीतून घालवून दिल्याचा विखारी जातीय अनुभव महात्मा फुले यांनाही आला होता.

याउलट हिंदू धर्माच्या तुलनेत मुस्लिम धर्मात काही मानवतावादी,समतावादी मूल्ये आहेत हे महात्मा फुले यांच्या लक्षात आले. मुस्लिम धर्माची ओळख त्यांना कशी झाली, यासंदर्भात त्यांनी आपला बालपणातील एक अनुभव नोंदविला आहे, ''मी लहान असताना माझे

आसपासचे शेजारी मुसलमान खेळगडी यांच्या संगतीने मतलबी हिंदू धर्माविषयी व त्यातील जातिभेद वगैरे कित्येक खोट्या मताविषयी माझ्या मनात खरे विचार येऊ लागले त्याबद्दल त्यांचे उपकार स्मरतो.'' स्वधर्मातील लोक वरातीतून भेदाभेद करून हाकलून देतात. मात्र परधर्मातील लोक सहकारी होतात. यामुळे महात्मा फुले यांना मुस्लिम धर्म जवळचा वाटणे स्वाभाविक होते. त्यांचा बालवयातील शैक्षणिक अनुभवही असाच लक्षणीय आहे. तो असा की, महात्मा फुल्यांचे वडील गोविंदराव फुले यांना त्यांच्या ब्राह्मण कारकुनाने जोतीबांना शाळेतून बाहेर काढण्याविषयी धूर्तपणे सल्ला दिला. त्या कारकुनाचा सल्ला ब्राह्मणी कावाच होता. या कावेबाजपणाला गोविंदराव फुले बळी पडले आणि जोतीबांचे शिक्षण थांबले. याउलट जोतीबाला शिक्षण देणे आवश्यक आहे, हे गोविंदरावांच्या मन:पटलावर बिंबविण्याचे काम केले ते मुस्लिम धर्मातील गफार बेग मुनशी व ख्रिस्ती धर्मातील दुसऱ्या एका सद्गृहस्थाने. या दोन परधर्मीय सद्गृहस्थामुळे जोतीबांचे शिक्षण पूर्ववत सुरू झाले. अशा महात्मा फुले यांनी अनेक आठवणी नोंदविलेल्या आहेत, ज्यातून त्यांना मुस्लिम धर्मातील मानवीय मूल्यांचा प्रत्यय आला.

**महात्मा फुले आणि ख्रिश्चन धर्म**

इस्लाम धर्माप्रमाणेच ख्रिश्चन धर्मातील जी काही मानवतावादी मूल्ये होती त्यांचा महात्मा फुले यांनी पुरस्कार केला. ख्रिस्ती धर्मात 'डेइस्ट' आणि 'थेईस्ट' असे जे पंथ आहेत त्यातील 'डेईस्ट' पंथ त्यांना अधिक जवळचा वाटतो. थेईस्ट पंथ हा परंपरावादी, पोथीनिष्ठ, अंधश्रद्ध आणि बायबलचे ग्रंथप्रामाण्य मानणारा होता, तर डेईस्ट पंथ हा पुरोहित, चर्च, बायबलचे ग्रंथप्रामाण्य नाकारून निखळ बुद्धिवादाचा पुरस्कर्ता होता. थॉमस पेन, फ्रँकलिन, वॉशिंग्टन, लाफायते हे सर्व डेईस्टपंथीय पाश्चात्त्य विचारवंत होत. त्यांच्या विचारसरणीचा अंशिक प्रभाव महात्मा फुले यांच्या लेखनावर आहे.

ब्रिटिश राजवटीत शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण झाले. त्यामुळे शूद्रातिशूद्रांनाही शिक्षण मिळू लागले. शिक्षणाच्या प्रसारामुळे डोळस झालेल्या शूद्रातिशूद्रातील नवशिक्षितांना ब्राह्मणी धर्मात होणाऱ्या शोषणाची जाणीव झाली. ''ब्राह्मणाने इतर शूद्र अति शूद्र जातींवर केलेली विद्याबंदी उठवून त्यांना शिकवून शहाणे करण्याकरिता ईश्वराने या देशावर इंग्रजांना पाठविले आहे. शूद्रादी अतिशूद्र शहाणे झाल्यावर ते इंग्रजांचे उपकार विसरणार नाहीत.'' असा महात्मा फुल्यांचा ब्रिटिशांकडे पाहण्याचा दृष्टिकोन होता. म्हणून ख्रिस्ती मिशनऱ्यांनी अनेकांना ख्रिस्ती करून आर्यांच्या कृत्रिम धर्माच्या गुलामगिरीतून मुक्त केले. याबद्दल ते समाधान व्यक्त करतात; परंतु पुढे या धर्माच्या मर्यादा लक्षात आल्यावर त्यांनी ख्रिस्ती धर्मावर टीकाही केली.

**ख्रिश्चन धर्मावर बौद्ध धम्माचा प्रभाव**

बौद्ध धम्माचा वैश्विक पातळीवर प्रचार सम्राट अशोकाने केला. या सम्राटाने बौद्ध धम्माला राजाश्रय देऊन भारत, ग्रीस, सिरिया, इजिप्त, मॅसिडोनिया, सिरियन, एपिरस, ब्रह्मदेश, सिलोन अशा विविध राष्ट्रांमध्ये बौद्ध धम्म प्रसारक पाठविले. अँत्रिकोस्टियस हा सिरियाचा राजा बौद्ध होता. त्यामुळे या देशात बौद्ध धम्माचा प्रसार सर्वत्र झाला.

भगवान बुद्धानंतर जवळपास साडेपाचशे वर्षांनी येशू ख्रिस्ताचा जन्म ज्या पॅलेस्टाईनमध्ये झाला तो प्रदेश सिरियाचा एक उपभाग होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे ख्यातनाम शिक्षक आणि महात्मा फुल्यांचे अनुयायी कृष्णराव अर्जुन केळुसकर असे प्रतिपादन करतात, ''यावरून पाहता बुद्ध धर्माचा पॅलेस्टाईनमध्ये येशू ख्रिस्ताच्या जन्मकाळी बराच प्रसार झाला होता, असे दिसते. दुसरे असे की, जॉन बापस्तित म्हणून जो एक यहुदी महासाधू पॅलेस्टाईनमध्ये येशू ख्रिस्ताच्या वेळी होऊन गेला. त्याने बाप्तिस्मा नावाचा विधी एसेनी पंथातल्या लोकांकडूनच घेतला. कारण यहुदी लोकांमध्ये असला विधी नव्हता. आता येशू ख्रिस्त या जॉनकडे काही दिवस जाऊन राहिला होता हे इतिहासप्रसिद्ध आहे आणि त्याने हा बाप्तिस्म्याचा विधी प्रथमत: या जॉनकडूनच घेतला हे प्रमाणसिद्ध आहे. त्याचप्रमाणे ख्रिस्ताने सदरील बौद्ध पंथाच्या लोकांचा नीतिबोध पुष्कळ ऐकिला असावा असेही अनुमान कित्येक करितात. या विधीला बौद्ध लोक अभिषेक म्हणतात. बौद्ध धर्माची दीक्षा घेणारांना हा विधी करावा लागत असून तो करिताना श्रद्धावान मनुष्यास बुद्ध, धर्म आणि संघ या त्रयींवर पूर्ण भाव आहे अशी प्रतिज्ञा करावी लागते.'' म्हणजेच जॉन बापस्तित या यहुदी महासाधूच्या माध्यमातून बौद्ध धर्मीयांचा अभिषेक विधी येशू ख्रिस्ताने घेतला. त्यालाच पुढे

बाप्तिस्मा असे नाव देण्यात आले. या विधीला ख्रिस्ती धर्मात अनन्य असे महत्त्व आहे. बौद्ध धम्माची दीक्षा ग्रहण करण्याचा एक मुख्य धार्मिक विधीच जेव्हा स्वीकारला जातो, तेव्हा या धर्माची मूलतत्त्वे जॉन बापस्तित आणि येशू ख्रिस्त यांनी स्वीकारलीच असणार यात काही शंका नाही. म्हणून ख्रिश्चन धर्मावर बौद्ध धम्माचा निश्चितपणे प्रभाव आहे असे म्हणणे अतिशयोक्त ठरत नाही. यासंदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकर असे ठामपणे विधान करतात की, "ख्रिश्चनांनी बौद्ध तत्त्वज्ञानाची नक्कल केली यात मुळीच वाद नाही." याच संदर्भान्वये महाराष्ट्र इतिहास संशोधन मंडळाच्या अहवालात अशी नोंद सापडते. "येशू ख्रिस्त जन्मास आला त्यावेळी बौद्ध धर्म स्थापन होऊन पाचशे वर्षे होऊन गेली होती. बौद्ध धर्म आणि ख्रिस्ती धर्म यात बराच सारखेपणा आहे." डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी याविषयी श्री ई.जी. टेलर यांचे आणखी एक मत उद्धृत केले ते असे, "बौद्ध धम्माप्रमाणे युटिनेरियन ख्रिस्ती बांधवही धर्मग्रंथ किंवा मतप्रणालीची बाह्य शक्ती नाकारून मानवाच्या अंतर्यामी असलेल्या मार्गदीपाचा आधार मान्य करतात. मनाच्या एकाग्रतेतून जागृत झालेली प्रज्ञा म्हणजेच मानवाच्या अंतर्यामी असलेला मार्गदीप होय. श्री. ई. जी. टेलर यांच्या प्रतिपादनाचा हाच अर्थ आहे की, प्रज्ञेला जसे बौद्ध मतप्रणालीमध्ये अनन्य महत्त्व आहे तसेच युनिटेरियन ख्रिस्ती धर्मामध्येही आहे.

### महात्मा फुले आणि हिंदू धर्म

भारतीय परिप्रेक्ष्यात हिंदू धर्म हा भारतीय समाजजीवनाच्या सर्व क्षेत्राची नियंत्रक शक्ती म्हणून अनेक शतके कार्यरत होता. शूद्रातिशूद्र आणि स्त्री यांच्या सर्वांगीण शोषणातील मुख्य कारक घटक म्हणजे हिंदू धर्म आणि धर्मग्रंथ होत. या धर्मातील अनिष्ट प्रथा, कर्मकांड, अंधश्रद्धा यांना धार्मिक कायद्याचे अधिष्ठान प्राप्त करून देण्यात आले. त्यामुळे शूद्रातिशूद्र व स्त्री या भारतीय शोषित घटकांच्या छळाला धर्ममान्यता मिळाली. हे महात्मा फुले यांनी अचूकपणे ओळखले. म्हणून त्यांनी हिंदू धर्म आणि धर्मग्रंथाचे परिशीलन करून त्यातील मानवी विघातकतेला कठोर विरोध दर्शविला.

वर्णव्यवस्था ही ईश्वरनिर्मित असल्याचे ब्राह्मणी धर्म आणि धर्मग्रंथात नमूद करण्यात आले. वर्णव्यवस्थेप्रमाणे ब्राह्मण, क्षत्रीय, वैश्य आणि शूद्र अशी श्रेणीबद्ध चार वर्णांत समाजाची विभागणी झाली. याव्यतिरिक्त वर्णबाह्य समजला गेलेला अस्पृश्यांचा आणखी एक वर्ग समाजात होता. समाजातील या सर्वच घटकांनी हिंदू धर्माचे पालन करणे म्हणजे अंधश्रद्धा, कर्मकांड, देवदैवाधीनता यांचे आचरण करणे, असे समाजमानस होते. प्रस्थापित ब्राह्मणी धर्मातील विकृतीवर भाष्य करताना डॉ. श्रीराम गुंदेकर म्हणतात, "व्यवसाय, कर्तव्य, धंदा म्हणजे धर्म, असाही चुकीचा अर्थ धर्माचा लावला. श्रमिकांनी श्रम करणे, ब्राह्मणांनी आयते खाणे आणि चोरांनी चोरी करणे हा त्यांचा धर्म आहे असे मानले जाऊ लागले. धर्म या संकल्पनेचे एवढे मतलबी अध:पतन करण्यात यशस्वी झाल्यावर तीर्थयात्रा, मंदिर, मठ, पूजा, विधी, अभिषेक, दाक्षिण्य, यज्ञ, हवन यांचे प्रस्थ वाढले. या दानकांडाचा व दानमहिमेचा एवढा अतिरेक झाला की, धर्म हा पावित्र्याचा विषय न राहता ब्राह्मण पुरोहितांच्या श्रमविरहित चरितार्थाचे हुकमी व अनैतिक साधन बनला." हिंदू धर्माचे हे स्वरूप शूद्रातिशूद्रांच्या शोषण आणि छळास कारक आहे, याची साधी जाणीवही या वर्गाला नव्हती. मात्र शूद्रातिशूद्रांच्या समग्र वेदनेच्या मुळाशी ब्राह्मणी धर्म आहे हे महात्मा फुले यांनी अचूक ओळखले. म्हणून त्यांनी हिंदू धर्मातील अनिष्टतेवर कठोर टीका केली.

हिंदू धर्मव्यवस्थेत अस्पृश्य व स्त्रियांचा शारीरिक व मानसिक अंगाने अधिकच छळ झाला. पेशवाईतील अस्पृश्यांवर झालेल्या अन्याय-अत्याचाराच्या परमोच्च बिंदूचे अधोरेखन करताना डॉ. श्रीराम गुंदेकर यांनी नोंदविले आहे, "म्हणून पेशवाईत महारामांगांच्या तोंडात तेल व शेंदूर ओतून त्यांना इमारतीच्या पायात, गढी, किल्ले व बुरुजात दडपून ठार मारण्याची प्रथा होती. या प्रथेलाही मनुस्मृतीत आधार आहे. ब्राह्मणांपुढे शूद्राने अनवधानाने जरी थुंकले, लघवी केली किंवा अधोवायू सोडला तर अनुक्रमे ओठ कापण्याची, मूत्रपिंड व गुद्द्वार कापण्याची शिक्षा मनुस्मृतीत सांगितली आहे. एवढेच नव्हे तर पेशवाईत अस्पृश्यांच्या कंबरेला झाडू आणि थुंकीसाठी गळ्यात मडके बांधण्यात आले. असा कितीतरी अमानवीय छळ धर्माआडून चालू होता. बहुजन समाजातील माळी, सुतार, कुंभार, तेली, तांबोळी, सोनार, लोहार वगैरेंची स्थिती कमीअधिक प्रमाणात सारखीच होती.

**सार्वजनिक सत्यधर्म**

धर्म हा समाजाची धारणा करत असतो. म्हणून जगभर धर्मविषयक चर्चा, चिंतन होत आले आहे. जीवनसंघर्षात हतबल झालेल्या आणि सभोवतीच्या दु:खद परिस्थितीने भयग्रस्त बनलेल्या सामान्य माणसासाठी धर्म साहाय्यभूत ठरत असतो. भारतात लोकायत, सांख्य, बौद्ध इ. धार्मिक विचारप्रणाली याच हेतूने अस्तित्वात आलेल्या आहेत.

सदरील विचारप्रणालीच्या पृष्ठभूमीवरच महात्मा जोतीबा फुले यांनी सार्वजनिक सत्यधर्माची मांडणी केली. प्रखर बुद्धिवाद, विज्ञानवाद, इहनिष्ठा, निसर्गधर्म इ. घटक या धर्माचे महत्त्वाचे विशेष होत. भारतात कोणत्याही काळात, लोकमानस धार्मिक भावनेने प्रेरित असल्याचा इतिहास आहे. याचे कारण ''माणूस जसा केवळ भाकरीवर जगत नसतो तसा तो केवळ बुद्धीवरही जगत नसतो. जोपर्यंत माणूस त्याच्या जीवघेण्या जीवनसंघर्षात टिकून राहण्यासाठी स्वत:ची ओळख करून घेण्याइतपत समर्थ बनत नाही तोपर्यंत तो बुद्धिवादाच्या आधारे वर्तन करू शकत नाही हे आता जवळजवळ सिद्ध होत चालले आहे. माणसाची ही मर्यादा हेच धर्माचे बलस्थान आहे हे आपण आता तरी ओळखले पाहिजे'' असे डॉ. रावसाहेब कसबे प्रतिपादित करतात. धर्माची ही भूमिका लक्षात घेतल्यानंतर महात्मा फुले यांच्या सार्वजनिक सत्यधर्माची मौलिकता स्पष्ट होते. आजच्याप्रमाणे त्यांच्याही काळात हिंदू, मुस्लिम, ख्रिश्चन असे अनेक धर्म अस्तित्वात होते. मात्र, मानवी उत्कर्षासाठी महात्मा फुले यांना त्या धर्माच्या मर्यादा स्पष्टपणे जाणवल्या होत्या. म्हणून त्यांनी सार्वजनिक सत्यधर्माच्या माध्यमातून सबंध मानवी जीवनाच्या कल्याणाला पोषक असा विचार मांडला. रा. ग. जाधव म्हणतात त्याप्रमाणे, ''सार्वजनिक सत्यधर्म हे त्यांच्या नव्या दर्शनाचे नाव होय.'' रा. ग. जाधव फुले विचारांचा 'दर्शन' म्हणून जो गौरवोल्लेख करतात त्यातच त्यांच्या विचारांची मौलिकता आणि सामर्थ्य आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची**


१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर - डॉ. बाबासाहेब आंबेडकर भाषणे आणि विचार, खंड-६, धम्म, पृ. ७४.

२) डॉ. सदानंद मोरे - महात्मा फुले : शोधाच्या नव्या वाटा, पृ. ३५.

३) डॉ. आ. ह. साळुंखे - सर्वोत्तम भूमिपुत्र गौतम बुद्ध, पृ. ५७८

४) महात्मा फुले - महात्मा फुले समग्र वाङ्मय, पृ. ५७२.

५) डॉ. आ. ह. साळुंखे - बळीवंश, पृ. ४४१.

६) महात्मा फुले - कित्ता, पृ. ३०.

७) डॉ. बाबासाहेब आंबेडकर - डॉ. बाबासाहेब आंबेडकर : लेखन आणि भाषणे, खंड-१८, भाग-३, पृ. ५५३.

८) गुरू गोपाळ चक्रनारायण – लॉर्ड बुद्धा वॉज दि फादर ऑफ येशू ख्रिस्त अँड महंमद पैगंबर, पृ. १८.

९) श्री.ई.जी. टेलर - उद्धृत - भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म, पृ. ४४५.


S.P. Mahavidyalaya, Bhoom Ta. Bhoom Dist. O'bad BHOOM

PRINCIPAL
S.P. Mahavidyalaya, Bhoom
Dist. Osmanabad